राम प्रहर
गुरुवार, २६ जानेवारी २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक १८९
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## तीन महिन्यांत ३० हजार शिक्षकांची भरती होणार -उपमुख्यमंत्री



**औरंगाबाद** : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्यात ७५ हजार नोकर भरती केली जाणार असल्याची घोषणा शिंदे-फडणवीस सरकारने मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात केली होती. त्या अनुषंगाने पुढील तीन महिन्यांत ३० हजार शिक्षकांची भरती करणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. औरंगाबादमध्ये विभागीय आयुक्त कार्यालयात नियोजन विभागाची बैठक बुधवारी (दि. २५) झाली. या वेळी ते म्हणाले की, २०१२पासून भरती बंद होती ती आम्ही सुरू केली. सर्वच जिल्ह्यांनी वाढीव मागण्या केल्या आहेत. जेवढ्या पूर्ण करता येणे शक्य आहे त्या पूर्ण केल्या जातील. आचारसंहिता असल्यामुळे त्याची घोषणा करता येणे शक्य नाही, असेही ते म्हणाले.

### राम प्रहर
### शुक्रवारचा अंक नाही

प्रजासत्ताक दिनानिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास गुरुवारी सुटी असल्यामुळे शुक्रवार (दि. २७)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी. **प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा!**

*-मुख्य संपादक*

# चांगली पिढी घडवण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची -ना. दीपक केसरकर

## ■ पनवेलमध्ये महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रचारार्थ स्नेहमेळावा

**पनवेल : प्रतिनिधी**

जगाचे नेतृत्व करायचे असेल तर चांगली पिढी घडविणे गरजेचे आहे. यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याने त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी चांगला प्रतिनिधी निवडून देणे गरजेचे आहे. त्यामुळे कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर बारकू म्हात्रे यांना विजयी करा, असे आवाहन राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी बुधवारी (दि. २५) पनवेल येथील मुख्याध्यापक व शिक्षकांच्या मेळाव्यात केले.




(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर...

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय, शिक्षक परिषद व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रचारासाठी पनवेलमधील विरुपाक्ष मंगल कार्यालयात मुख्याध्यापक व शिक्षकांचा स्नेहमेळावा आयोजित केला होता.

या मेळाव्यास प्रमुख मान्यवर म्हणून राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार भगवान साळुंखे, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, सुधागड एज्युकेशन संस्थेच्या कार्याध्यक्षा गीता पालरेचा, डी. डी. विसपुते संस्थेचे धनराज विसपुते, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, वामन म्हात्रे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, बाळासाहेबांची शिवसेनाचे रामदास शेवाळे, प्रथमेश सोमण आदी व्यासपीठावर उपस्थित होते. (पान २ वर...)

> **कोकण शिक्षक मतदारसंघाची जबाबदारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्याकडे दिली आहे. गेली अनेक वर्षे कोकणची जबाबदारी पार पाडत असताना अनेक गोष्टी बारकाईने पाहिल्या आहेत. मागील निवडणुकीत २८०० मतदार चुकले, त्यामुळे योग्य प्रकारे मतदान झाले पाहिजे. कुठलीही चूक होऊ नये यासाठी आपण सर्वांनी दक्ष राहणे गरजेचे आहे. शिक्षकांचा आमदार शिक्षकच झाला पाहिजे आणि हा अधिकार तुम्हाला आहे. त्यामुळे काळजी घ्या, योग्य प्रकारे मतदान करा.**
>
> **-रवींद्र चव्हाण, सार्वजनिक बांधकाम मंत्री**

## दुचाकी घसरून तरुण दरीत कोसळला


### जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर शिंग्रोबा मंदिराजवळील घटना

**खोपोली : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई-पुणे हायवेवर मंगळवारी (दि. २४) रात्री अपघात घडला. शिंग्रोबा मंदिराच्या मागे असणाऱ्या खिंडीत रात्रीच्या वेळी एक तरुण दुचाकी घसरल्याने दरीत कोसळला.

अक्षय अशोक महाजन (वय २९, रा. सुकापूर, नवीन पनवेल) हा तरुण पुण्याहून पनवेलला जात असताना दरीत कोसळला. त्याने स्वतः आपण दरीत कोसळलो असून खाली घसरत चाललो आहे, याची माहिती वडिलांना फोनवरून दिली. अक्षयच्या फोननंतर शोधकार्य सुरू झाले.

लोणावळा शहर आणि खोपोली पोलिसांनी तत्काळ मुंबई-पुणे हायवेवर त्याचा शोध सुरू केला. अक्षय दरीत नेमके कुठे हे ठाऊक नव्हते. शोध सुरू असतानाच त्याची दुचाकी शिंग्रोबा मंदिराच्या



मागील दरीत घसरल्याचे बोरघाट पोलिसांच्या निदर्शनास आले. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी संस्थेची टीम पोहचली. त्यांना ५० फुटांवर दुचाकी दिसली. अक्षय त्याहून खोल २५० फूट दरीत होता. चार तासांच्या प्रयत्नांनंतर अक्षयला खोल दरीतून सुखरूप काढण्यात आले. (सविस्तर वृत्त पान २ वर...)

## माणगावच्या पळसगाव भागात बिबट्याचा संचार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका पूर्व विभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पळसगाव भागात काही दिवसांपासून वाघ आणि बिबट्या असल्याचे अनेक नागरिकांच्या निदर्शनास आल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याच्या सूचना माणगाव वनविभागाचे वनरक्षक अनिरुद्ध ढगे यांनी दिल्या आहेत. वनविभागाने या भागात गस्तही वाढवली आहे.

ढालघर फाटा येथील विंचवली येथील गावातील नागरिकांच्या व होडगाव कोंड येथील काही दुचाकीस्वारांच्या बिबट्या निदर्शनास आला. रविवारी रात्रीच्या वेळी रिक्षाचालक पराग सावंत यांनी आंब्रेवाडी ते पळसगांव बुद्रुकदरम्यान बिबट्या रस्त्याच्या कडेला उभा असलेला पाहिला. आंब्रेवाडी पोलीस पाटील राकेश पवार यांनी याबाबत वनक्षेत्रपाल अनिरुद्ध ढगे यांना माहिती दिली.

त्यानंतर वनविभागाचे कर्मचारी व अधिकाऱ्यांनी त्या भागात गस्त वाढविली असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे.

## 'त्या' सात जणांची हत्याच


**पुणे** : दौंड तालुक्यातील पारगाव येथे भीमा नदीत सात जणांचे मृतदेह सापडल्यानंतर खळबळ उडाली होती. ही आत्महत्या नसून हत्या असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणी पाच आरोपी अटकेत आहेत. त्यातील चार पुरुष, तर एक महिला आरोपी आहे.

पोलीस अधीक्षक अंकित गोयल म्हणाले, तपासासाठी आम्ही अनेक पथके तयार केली. काही पुरावे समोर आले. त्यातून लक्षात आले की, हा घातपात करून त्यांचा खून करण्यात आला आहे. (पान २ वर...)

## कशेडी घाटात चार लाखांची अवैध दारू हस्तगत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील धामणदिवी येथे स्कोडा कारमधून गोवा बनावटीच्या दारूची अवैध वाहतूक करताना राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून धडक कारवाई करून एकाला अटक केली आहे. स्कोडा कारसह चार लाख १८ हजारांची दारूही हस्तगत करण्यात आली.



मंगळवारी रात्री स्कोडा कारमधून एक जण गोवा बनावटीच्या दारूची अवैधरित्या वाहतूक करणार असल्याची माहिती मिळाल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून धामणदिवी येथे सापळा रचण्यात आला. मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास ही स्कोडा कार आल्यावर कार थांबवून हेमंत रेडकर (रा. देऊळवाडी, सिंधुदुर्ग) याला ताब्यात घेण्यात आले आहे.

उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरिक्षक एस. पी. जाधव हे अधिक तपास करीत आहेत.










# महामार्गावरील अपघातांबाबत युद्धपातळीवर चर्चा

## अलिबागमध्ये वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक

### संबंधितांना उपाययोजनेच्या महत्त्वाच्या सूचना



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस अधीक्षक कार्यालय अलिबाग येथील मिटींग हॉलमध्ये मुंबई-गोवा महामार्गावरील भीषण अपघात रोखण्याच्या दृष्टिकोनातून वरीष्ठ पातळीवर बैठका घेवून त्वरीत उपाय योजना करण्याच्यादृष्टिने मंगळवारी (दि.२४) सायंकाळी बैठक घेण्यात आली. या बैठकीत महामार्गावरील होणाऱ्या छोट्या अपघातांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीकरीता पोलीस अधीक्षक महामार्ग तानाजी चिखले, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.देवकाते, उपविभागीय पोलीस अधिकारीसंजय शुक्ला, श्री.सुर्यवंशी, श्री.स्वामी, मुंबई गोवा हायवे लगत असणारे ११ पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी त्याचप्रमाणे जिल्हा वाहतुक शाखा रायगड अधिकारी उपस्थित होते.

मुंबई गोवा महामार्गचे काम पहाणारे प्रकल्प संचालक एन.एच.ए.आय. कळंबोली पनवेल, यशवंत घोटकर, कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग पेणश्रीकांत बांगर, मॉर्थ टीम लिडर प्रसाद देशपांडे तसेच मुंबई गोवा महामार्गवरील काम करणारे कॉन्ट्रॅक्टर जे.एम.म्हात्रे, इंन्फ्रा प्रा.लि., कल्याण टोलवेज प्रा.लि. चेतक प्रा.लि. एल. ॲन्ड टी प्रा.लि. असे बैठकीकरीता उपस्थित राहुन मुंबई-गोवा महामार्गावर होणाऱ्या प्राणांतिक अपघातांचे वाढते प्रमाण या अनुषंगाने महामार्गावरील अपघात प्रवण क्षेत्राचे विश्लेषण व उपाय योजना यावर सविस्तर चर्चा झाली. उपाययोजनेबाबत करावयाच्या डायव्हर्शन बोर्ड, ब्लींकर्स, सुचना बोर्ड, कॅटआय, रिफलेक्टर पट्टी लावुन, उपाययोजना करून महामार्ग सुरक्षीत करून वाहन चालकास सुचना कळाव्यात याबाबत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडून आदेश देण्यात आलेले आहेत.

तसेच महामार्गावर ज्या ठिकाणी फोर लेनचे काम पूर्ण झाले आहे तेथील उपाययोजना पूर्ण करणे, ज्या ठिकाणी काम सुरू आहे, त्या ठिकाणी सूचना फलक लावणे, तसेच महामार्गावर रस्त्याचे काम झाल्यावर कोणी मध्येच डिव्हायडर काढून सोयीकरीता रस्ता केल्यास पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांची मदत घेवून गावकऱ्यांशी संपर्क साधणे. त्याचप्रमाणे कॉन्ट्रक्टर यांनी काम घेताना नेमुन दिलेल्या नियमाप्रमाणे कामकाज करणे आपली जबाबदारी आहे.कोणतीही प्राणांतिक अपघाताची घटना घडल्यास चौकशी होवून जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडून सांगण्यात आले.

**महामार्ग ठेकेदारांनी जबाबदारी घ्यावी**

पोलीस अधीक्षक महामार्ग (HSP) तानाजी चिखले यांनी कॉन्ट्रक्टर यांनी महामार्गाची जबाबदारी घेणे आवश्यक आहे. अपघात होवू नये याकरीता प्रामाणीकपणे उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यानंतर महामार्गाचे प्रकल्प संचालक यशवंत घोटकर, कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग पेण श्रीकांत बांगर यांनी पोलीस अधीक्षक रायगड यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे ज्या रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे, त्या ठिकाणी आम्ही तात्काळ सर्व उपाय योजना करून घेतो. तसेच ज्या ठिकाणी रस्त्याचे काम सुरु आहे त्या ठिकाणी सूचना बोर्ड ब्लिंकर्स वैगेरे उपाय योजना करणेबाबत सर्व कॉन्ट्रक्टर यांना सूचना देतो असे आश्वासन या बैठकीत दिले आहे.

# नवीन पनवेल भागातील तरुणीची फसवणूक

### नपुंसक असल्याचे लपवल्याप्रकरणी पतीसह नातेवाईकांवर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

मुंबईच्या परळ भागात राहणाऱ्या एका व्यक्तीने नपुंसक असल्याची बाब लपवून ठेवत नवीन पनवेल भागातील एका २७ वर्षीय तरुणीसोबत विवाह करून तिची आणि तिच्या कटुंबीयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणी नपुंसक पतीसह त्याच्या नातेवाईकांविरोधात फसवणुकीसह छळवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेतील तक्रारदार तरुणी नवीन पनवेल भागात आई वडील आणि भावासह राहण्यास आहे. तर तिच्यासोबत लग्न करणारा तिचा नपुंसक पती मुंबईच्या परळ भागात राहण्यास आहे. फेब्रुवारी २०२१ मध्ये या दोघांचा साखरपुडा आणि विवाह परेल येथे झाला होता. लग्नानंतर पतीने तरुणीसोबत शरीरसंबंध ठेवणे घाण वाटत असल्याचे सांगून त्याने तिच्यापासून दूर राहण्यास सुरुवात केली होती. तसेच तिच्या पतीने आणि सासरकडील मंडळींनी तिला शिवीगाळ करुन तिला छळण्यास सुरुवात केली.

तरुणीने आपल्या नपुंसक पतीला ठाणे येथे औषधोपचारासाठीदेखील नेले होते. त्यावेळी तेथील डॉक्टरांनी त्याच्यामध्ये वंध्यत्व असल्याचे सांगितले होते तसेच त्यासाठी त्याला औषध गोळ्या देखील दिल्या होत्या, मात्र या तरुणीच्या पतीने त्या गोळ्या घेण्यास नकार दिला होता.

तरुणी आपल्या पतीसोबत फक्त सव्वा महिने राहिली. त्यानंतर होळीनिमित्त माहेरी आली, तेव्हा तिने पती नपुंसक असल्याची माहिती आपल्या आई-वडिलांना दिली होती. त्यामुळे आई-वडिलांनी पतीला आणि त्याच्या नातेवाईकांना संपर्क साधला असता, त्यांनी मुलीला सासरी पाठविल्यास तिला मारून टाकण्याची धमकी दिली. त्यानंतर या तरुणीने खांदेश्वर पोलीस ठाणे तसेच महिला आयोगाकडे याबाबत लेखी तक्रार दिली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने खांदेश्वर पोलिसांनी तरुणीच्या पतीसह तिच्या सासरकडील मंडळीविरोधात फसवणुकीसह छळवणुकीचा गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.



भाजपचे नेते सुधीर घरत व शैलजा सुधीर घरत यांच्या निवासस्थानी माघी श्री गणेश जयंतीनिमित्त विराजमान झाले.



माघी श्री गणेश जयंतीनिमित्त विराजमान गणरायाचे कामोठे येथील किशोर मुंढे, यांनी सहपरिवार दर्शन घेतले.

# शिंग्रोबा मंदिराजवळील दरीत दुचाकीसह तरुण कोसळला

## युवकाला दरीतून काढणाऱ्या देवदूत टिमचा सत्कार



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई पुणे हायवेवर मंगळवारी (दि.२४) रात्री एक थरारक अपघात घडला. जुना पुणे-मुंबई महामार्गावर शिंग्रोबा मंदिराच्या पाठीमागे असणाऱ्या खिंडीत रात्रीच्यावेळी एक दुचाकीस्वार (एक्टिवा स्कूटी) दुचाकी घसरल्याने दरीत कोसळला. अक्षय अशोक महाजन (वय २९ वर्ष, रा. सुकापूर, नवीन पनवेल) हा युवक पुण्याहून पनवेलला जात असताना दरीत कोसळला. त्याने स्वतः आपण दरीत कोसळलो असून खाली घसरत चाललो आहे, याची माहिती वडिलांना फोनद्वारे त्याने दिली. या अक्षयच्या फोन नंतर शोध कार्य सुरू झाले.

लोणावळा शहर पोलीस आणि खोपोली पोलीस यंत्रणेने तत्काळ पाऊले उचलत मुंबई पुणे हायवेवर त्याचा शोध सुरु केला. अक्षय दरीत कोसळला, पण नेमके कुठे हे ठाऊक नव्हते, तेव्हा शोध चालू असतानाच त्याची दुचाकी शिंग्रोबा मंदिराच्या पाठीमागील दरीत घसरल्याचे बोरघाट पोलिसांच्या निदर्शनास आले. समजले. त्यानंतर तिथे अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेची टीम रेस्क्युसाठी पोचली त्यांना ५० फुटांवर दुचाकी दिसून आली. मात्र, अक्षय त्याहून खोल २५० फुट दरीत होता. त्यामुळे पोलिसांनी अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थे सोबत शिवदुर्ग मित्र लोणावळा, महामार्गावरील देवदूत टीम आणि खोपोली फायर ब्रिगेडला पाचारण केले.

सर्वांनी साधारण चार तासांच्या अथक प्रयत्नाअंती अत्यंत साहसाने अक्षयला खोल दरीतून सुखरूप वर काढले व उपचारासाठी पनवेल येथे रवाना केले. अक्षयची दुचाकी देखील वर खेचण्यात आली आणि खोपोली पोलिसांनी तीचा ताबा घेतला. .

अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था, शिवदुर्ग मित्रमंडळ लोणावळा, खोपोली फायर ब्रिगेड, आयआरबी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्सचे जवान, खोपोली शहर पोलिस, लोणावळा शहर पोलिस, बोरघाट वाहतूक पोलीस यंत्रणा आदी यंत्रणा या कार्यात सहभागी झाल्या होत्या.

शिवदुर्ग मित्र मंडळ लोणावळा, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था आणि देवदूत टीमचे खोपोली पोलीस स्टेशनचे निरीक्षक शिरीष पवार यांनी कौतुक केले.

पान १ वरुन

## चांगली पिढी घडवण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची -ना. दीपक केसरकर

मंत्री दीपक केसरकर पुढे म्हणाले की, शिक्षण हे पवित्र कार्य आहे. भावी पिढी घडवण्याची जबाबदारी शिक्षकांची असते. त्यामुळेच शिक्षकांचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. नवीन शैक्षणिक धोरण विश्वामध्ये अग्रेसर करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून होत असून शिक्षक आणि विद्यार्थी यांना केंद्रबिंदू मानून काम होत आहे. या धोरणाच्या अनुषंगाने शिक्षणमंत्री म्हणून आम्ही गांभीर्याने बघत आहोत. शिक्षकांसाठी १,१६० कोटींचे पॅकेज आणि त्याची अंमलबाजवणी करण्यात येत आहे, मात्र विरोधकांना टीकेशिवाय काहीही उरलेले नाही. आम्ही शिक्षकांना न्याय देण्याच्या भूमिकेतून कार्यरत आहोत. शिक्षण क्षेत्रात क्रांती करायची असल्याने शिक्षकांना कोणतीही इतर कामे दिली जाणार नाहीत. दैनिकाच्या चित्रकला स्पर्धेत लाखो मुले सहभाग घेतात, ही ताकद शिक्षकांचीच आहे. अभियांत्रिकी शिक्षण मराठीतून दिले जाणार आहेच, पण त्याच वेळी त्या विद्यार्थ्याला इतर भाषांचेही शिक्षण दिले जाणार आहे. शैक्षणिक क्षेत्रात अमूलाग्र बदल करायचे आहेत. त्यासाठी शिक्षकांचा चांगला प्रतिनिधी वरिष्ठ सभागृहात असणे आवश्यक आहे. ज्ञानेश्वर म्हात्रे शिक्षक असल्याने त्यांना शिक्षक व विद्यार्थ्यांचे प्रश्न माहित आहेत. म्हणून त्यांना निवडून देण्याचे त्यांनी आवाहन केले.

महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी, आपण मागील निवडणुकीत चूक केली, आता ती सुधारायची आहे, असे सांगून आपण आतापर्यंत केलेल्या कामांची माहिती दिली. ज्यांना आपल्या संस्थेतील शिक्षकांना न्याय देता आला नाही, त्यांना मत देण्याची चूक करू नका. मला विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडावायचे आहेत. त्यांना व्यावहारिक ज्ञान द्यायचे आहे. अशैक्षणिक कामातून शिक्षकांना मुक्त करायचे आहे. हे सरकार गोरगरिबांना न्याय देणारे आहे. या राज्य सरकारने १,१६० कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करीत ६१ हजार शिक्षकांना न्याय दिला आहे. शिक्षक नसलेल्या माणसाने आमदार होऊन वाटोळे केले आहे. या आमदाराने विधिमंडळात अभ्यास न करता चुकीच्या पद्धतीने प्रश्न मांडला आणि शिक्षकांची दिशाभूल केली. पेन्शनवर काम सुरू आहे आणि सत्तेतील हे सरकारच ते करू शकतात. त्यामुळे मी निवडून आल्यावर तुमचा प्रतिनिधी म्हणून पहिले पेन्शनचा प्रश्न सोडवणार आहे. माझा निधी शैक्षणिक कामासाठीच खर्च करणार असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

शिक्षक परिषदेचे माजी आमदार भगवान साळुंखे, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे व गीता पालरेचा यांनीही ज्ञानेश्वर म्हात्रे यांना मतदान करण्याचे आवाहन केले. या मेळाव्यास भाजपचे विस्तारक अविनाश कोळी, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहर सरचिटणीस नितीन पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, विनोद साबळे, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, अनिल भगत, प्रकाश बिनदार, बबन मुकादम, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजेश्री वावेकर, युवा नेते दशरथ म्हात्रे, रुपेश ठोंबरे, मयुरेश नेतकर, रोहित जगताप, सुदाम माळी, विकास पाटील, भोसले सर यांच्यासह शिक्षक आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

“

ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या कामाची पद्धत उत्तम आहे. कणखर आवाज आणि त्यांच्या कामाचा आढावा पाहता शिक्षकांमध्ये स्फूर्ती तयार झाली आहे. राजकीय पक्ष, मित्रपक्ष तसेच २१ संघटनांचा त्यांना पाठिंबा मिळाला असून ताकद वाढली आहे. त्यामुळे ज्ञानेश्वर म्हात्रे प्रथम पसंतीने निवडून येणार आहेत. शिक्षण क्षेत्रात काम करणारे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार, चेअरमन अनिल पाटील हे रयत संस्थेच्या कोणत्याही शिक्षकावर दबाव टाकणार नाहीत, त्यामुळे या संस्थेतील शिक्षकांना त्यांच्या पसंतीनुसार मतदान करता येणार आहे.

**-लोकनेते रामशेठ ठाकूर,** माजी खासदार

कोकण शिक्षक मतदारसंघातून २०१७पर्यंत शिक्षकांचा प्रतिनिधीच आमदार होता. त्यानंतर आलेल्या प्रतिनिधीने शिक्षकांचे प्रश्न सोडवले नाहीत. आता पुन्हा ती घोडचूक करू नका. शिक्षक प्रतिनिधी पाहिजे हा आग्रह धरा. पनवेल तालुक्यातून ६० टक्केपेक्षा जास्त मते ज्ञानेश्वर म्हात्रे यांना मिळतील, असा विश्वास मला आहे.

**- आमदार प्रशांत ठाकूर,** भाजप रायगड जिल्हाध्यक्ष

आपले उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे चळवळीतले व सतत शिक्षकांसाठी काम करणारे असून त्यांना वाढता प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे विरोधकांचे डिपॉझिट जप्त होईल.

**-भगवान साळुंखे,** माजी शिक्षक आमदार

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रामाणिकपणामुळे हे सभागृह तुडूंब भरले आहे. मिळणारा उदंड प्रतिसाद ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या विजयाची खात्री देत आहे.

**-गीता पालरेचा**

## 'त्या' सात जणांची हत्याच

पाचही आरोपी नातेवाईक असून ते एकाच गावातील रहिवासी आहेत. आरोपी अशोक पवार यांचा भाऊ धनंजय पवार यांचा अपघातात मृत्यू झाला होता आणि त्याला कारणीभूत हे पवार कुटुंब होते.

त्याचा राग मनात धरून ही हत्या करण्यात आली आहे. सगळे आरोपी हे एकमेकांचे बहिण-भाऊ आहेत.

मृतांमध्ये अशोक पवार, श्याम पवार, शंकर पवार, प्रकाश पवार, कांताबाई जाधव, या पाच जणांना अटक करण्यात आली आहे. मोहन पवार (४५), संगिता पवार (४०, दोघेही रा. खामगाव, ता. गेवराई, जि. बीड), शाम पंडीत फुलवरे (२८), राणी फुलवरे (२४) रितेश फुलवरे (७), छोटू फुलवरे (५) कृष्णा फुलवरे (३, चौघेही रा. हातोला, ता. वाशी, जि. उस्मानाबाद) यांचा समावेश आहे.

# जुनी पेन्शन हक्कासाठी कोकण भवनात घोषणा




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मी शपथ घेतो की, मला पेन्शन नाकारणाऱ्या पक्षाला मी मत देणार नाही. जर पेन्शन देऊ शकत नसेल तर, मी माझे कुटुंबिय आणि मित्रपरिवार यांच्यावतीने त्या पक्षाला अजिबात मत देणार नाही. आता माझेही ठरले आहे. आजपासून शपथ घेतो की, जुन्या पेन्शनचा प्रचार आणि प्रसारही करील. जो पेन्शन देईल त्यालाच मत देईन.' अशी प्रतिज्ञा घेऊन, जुनी पेन्शन हक्कासाठी आज (दि. २५) कोकण भवनमध्ये जुनी पेन्शन हक्क समितीमार्फत घोषणा करण्यात आल्या.

कोकण भवन इमारतीच्या आवारात जुनी पेन्शन हक्क समिती, कोकण विभागाच्या अध्यक्षा तथा प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई वंदना कोचुरे यांनी कोकण भवनात कार्यरत असलेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांबरोबर राज्य शासकीय कार्मचाऱ्यांनी जाहीर केलेले शपथपत्र वाचून शपथ घेतली. यावेळी राजपत्रित अधिकारी महासंघाचे सचिव डॉ. गणेश धुमाळ, समितीचे सचिव तथा माजी सैनिक संघटना कोकण विभागाचे अध्यक्ष अजित न्यायनिर्गुणे, सहसचिव अपर्णा गायकवाड, समितीचे कोषाध्यक्ष विनोद वैदू, बृहन्मुंबई राज्य शासकीय संघटनेचे मोरेश्वर चौधरी, चतुर्थश्रेणी कर्मचारी संघनेच्या जनाबाई साळवे, विद्युत विभाग कर्मचारी संघटनेचे चंद्रकांत पवार उपस्थित होते.

राज्य मंत्रीमंडळाने ऑक्टोबर २००५ रोजी बैठकीत निर्णय घेऊन १ नोव्हेंबर २००५ नंतर सरकारी सेवेत रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी १९८२ ची जुनी पेन्शन योजना रद्द केली. आणि नवीन डीसीपीएस योजना लागू केली. ही योजना रद्द करुन जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी राज्यातील शासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनांमार्फत करण्यात येत आहे. कोकण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन हक्क समितीची स्थापना केली आहे. या समितीच्या अध्यक्षा तथा प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई वंदना कोचुरे यांनी बुधवारी कोकण भवनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत जुनी पेन्शन न देणाऱ्या पक्षाला मतदान करणार नाही अशी शपथ घेतली.


॥ प्रथम पुण्यस्मरण ॥



मृत्यू दि. २६/०१/२०२२

**कै. सौ.चंपा दामोदर ठाकूर**

यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित विनम्र अभिवादन

खोपटे गावच्या आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षिका कै. सौ.चंपा दामोदर ठाकूर यांना वयाच्या ७५ व्या वर्षी दि:२६ जानेवारी २०२२ रोजी देवाज्ञा झाली.

शोकाकूल :- ठाकूर परिवार

स्थळ:- मु.पो. खोपटे, ता. उरण, जि. रायगड


# पालकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे

## एमएनएम विद्यालय व टीएनजी महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पालकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमावेळी केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचा मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व तुकाराम नारायण घरत (टीएनजी) कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन मंगळवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. हा सोहळा संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.



(छाया : योगेश पाटील)

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचा मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. २४) मोठ्या उत्साहात झाला. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतीक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले तसेच विद्यालयाचा वार्षिक अहवालाचे प्रकाशन केले.

या सोहळ्याला संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सौ. शकुंतला ठाकूर विद्यालयाच्या सीबीएसई विद्यालयाचे चेअरमन परेश ठाकूर, मराठी माध्यमचे चेअरमन शरद खारकर, वसंतशेठ पाटील, अनंता ठाकूर, रघुनाथ देशमुख, माजी नगरसेविका दर्शना भोईर, अर्चना परेश ठाकूर, मीनाक्षी पाटील, विश्वनाथ कोळी, भाऊशेठ पाटील, श्रीकांत घरत, अजय भगत, कमलाकर देशमुख, अर्चना मिश्रा, मृत्युंजय कन्हैया, चंद्रकांत घरत, छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका साधना डोईफोडे, सौ. शकुंतला ठाकूर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, प्रभारी मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## घरफोडीत नऊ लाखांचे दागिने चोरी

### कळंबोलीतील घटना

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरामध्ये चोरी, घडफोडीच्या घटना वाढल्या आहेत. अशीच एक घटना कळंबोली सेक्टर-४ ई मध्ये घडली. येथे भरदिवसा अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून तब्बल नऊ लाख १२ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

कळंबोली, सेक्टर- ४ई मधील एफ-१ इमारतीत सुळ कुटुंबीय राहत असून सचिन सूळ आणि त्यांची पत्नी राजश्री सुळ दोघेही कामाला आहेत. सचिन सुळ नेहमीप्रमाणे आपल्या कामावर गेले होते. तर राजश्री या आपल्या मुलाला क्लासमध्ये तर मुलीला शाळेत सोडून कामावर गेल्या होत्या. यादरम्यान त्यांचे घर बंद असल्याने चोरट्याने संधी साधून अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचा कडी-कोयंडा तोडून घरातील सोन्याचे वेगवेगळ्या प्रकारचे दागिने आणि रोख रक्कम असा तब्बल नऊ लाख १२ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला.

दुपारीच्या सुमारास सचिन सुळ यांचे मोठे बंधु त्यांच्या घरी गेले असताना, त्यांना हा प्रकार निदर्शनास आला. याबाबतची माहिती त्यांनी त्यानंतर सचिन आणि राजश्री यांना दिल्यानंतर त्यांनी आपल्या घराकडे धाव घेतली. या वेळी घरातील सर्व दागिने चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात याबाबतची तक्रार दाखल केली.

## माता पालक मेळावा आणि हळदीकुंकू

### गव्हाण विद्यालयात कार्यक्रम उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील गव्हाण-कोपर येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन अत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये माता पालक मेळावा आणि त्यानिमित्ताने हळदीकुंकू समारंभ मंगळवारी (दि. २४) आयोजित करण्यात आला होता. पनवेल पं. स. माजी सदस्य रत्नप्रभा घरत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास अर्चना परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



या समारंभात नावडे शाखेतील प्राध्यापिका व पनवेल अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सदस्या करुणा तांडेल यांचे पालकमातांना किशोरवयीन मुला मुलींच्या समस्या या विषयावर प्रमुख व्याख्यान झाले तसेच विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांनी पालक मातांनी पालक व्हावे मालक नव्हे असा सल्ला आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून दिला. तर अर्चना परेश ठाकूर यांनी गव्हाण विद्यालय अतिशय स्तुत्य उपक्रम नेहमीच घेत असते, विद्यालयाची वाटचाल आणि विद्यालयाची परंपरा उत्कृष्टाकडे आहे असे गौरवोद्गार काढले आणि सर्व पालक मातांना आणि शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला पानवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर, कल्पना ठाकूर, रयतच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, कामिनीताई कोळी, उषाताई देशमुख, सुनिता घरत, हौसाबाई कोळी, मंजुळा कोळी, सुनीता कांबळे, सीमाताई भगत, हेमलताताई भगत, नंदा भोईर यांच्यासह पालक माता उपस्थित होत्या. या समारंभात सर्व पालक मातांसाठी मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आले. फनी गेम मध्ये संगीत खुर्ची व चेंडू बादली मध्ये टाकणे यासारख्या खेळांचा समावेश करण्यात आला होता. या स्पर्धांमध्ये माता पालकांनी अतिशय उत्साहात सहभाग घेतला. ज्या मातांचा प्रथम क्रमांक आला त्यांना भेटवस्तू देवून सन्मानित करण्यात आले.

## खारघरमध्ये आज रक्तदान आणि आरोग्य शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमध्ये श्री. दुर्गामाता फेरीवाला संस्था, शुभारंभ सामाजिक संस्था, खारघर मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल आणि एम.जी.एम कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान शिबिर व आरोग्य शिबिरचे आयोजन गुरुवारी (दि. २६) करण्यात आले आहे. या शिबिराला प्रमुख अतिथी म्हणून भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभणार आहे.

सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत होणारे हे शिबिर प्रभाग क्रमांक ०६ खारघर सेक्टर १५ सुवर्णा गंगा ज्वेलर्स या ठिकाणी आयोजिले आहे. रक्तदान हे श्रेष्ठदान असल्यामुळे सगळ्यांनी यात सहभाग घ्यावा, असे आवाहन माजी नगरसेवक निलेश बाविस्कर व कंचन बिर्ला यांनी केले आहे. शिबिरामध्ये मधुमेह, रक्तदाब, त्वचारोग, हाडांची तपासणी करण्यासाठी संबंधित तज्ज्ञ डॉक्टर येणार आहेत.





**पनवेल : माघी गणेशोत्सवानिमित्त माझी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी न्हावेखाडीच्या मधलापाडा परिसरातील गणेशमंदिरात गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी कान्हाशेठ ठाकूर, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, रविशेठ पाटील, सी. एल. ठाकूर आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने सर्वांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.**



**पनवेल : शेळके जीमची महिला बॉडी बिल्डर गौरी वरणकर हिने उरणमध्ये शुक्रवारी या झालेल्या राज्यस्तरीय स्ट्राँग क्लासीक २०२३ स्पर्धेत व शनिवारी सोमाटणे येथे झालेल्या ॲडव्होकेट श्री २०२३ या स्पर्धेत वुमन फिजिक ह्या गटात विजेतेपद पटकाविले आहे. हा किताब मिळविणारी गौरी ही पनवेलसह रायगडातील पहिली महिला ठरली आहे.**



**पनवेल : ॲड. गुरुनाथ कडव यांना वाढदिवसानिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हा ओबीसी मोर्चाचे युवा अध्यक्ष प्रसाद म्हात्रे यांनी शुभेच्छा दिल्या.**

## बाळासाहेबांच्या शिवसेनेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**पनवेल : वार्ताहर**

बाळासाहेबांची शिवसेना पनवेल यांच्यातर्फे उल्लेनिय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संत शिरोमणी गोरोबा काका कुंभार यांच्या पनवेल कुंभारवाडा येथील मंदिरामध्ये झाला. हा कार्यक्रम विभागप्रमुख ॲड. आशिष विजय पनवेलकर यांनी आयोजित केला होता.

या वेळी ऋषिकेश पेणकर यांचा पंजाब येथे झालेल्या शरीर सौष्ठव स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळालेला असून भारत श्री या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. त्याबाबत बाळासाहेबांच्या शिवसेनेने जाहिररित्या सत्कार करण्यात आला. डॉ. जान्हवी संतोष वाजेकर पनवेल व उरण तालुक्यामध्ये बीडीएस ही पदवी मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचाही सत्कार करण्यात आला. ॲड. ओंकार विजय पनवेलकर कायदेविषयविधी महाविद्यालयातून उत्तीर्ण झाल्याबद्दल त्याचाही सत्कार करण्यात आला. तसेच कराटे क्षेत्रात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली निधी अरविंद पनवेलकर, संगीत क्षेत्रात झालेली निधी अरविंद पनवेलकर, संगीत क्षेत्रात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या शौर्य रवींद्र उतेकर, शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या शुभ्रा कपिल कळवेकर, १० वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या आर्यन राजकुमार मिश्रा यांचा सत्कार करण्यात आला. तसेच एनसीसीमध्ये बी सर्टीफिकेटस घेवून उत्तीर्ण होणाऱ्या हर्षद मंगेश साळवी, नर्सिंग क्षेत्रात प्राविण्य संपादन केलेल्या भक्ती मंगेश सल्वी, क्रिडा क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या लोमेश नरेंद्र पनवेलकर व नुपूर दैवत पनवेलकर यांचाही सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला बाळासाहेबांच्या शिवसेनेचे रायगड जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, पनवेल महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण, पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, पनवेल शहर संघटक अभिजित साखरे, पनवेल शहर प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान, उपशहरप्रमुख अर्जुन परदेशी, तसेच शाखाप्रमुख किरण कळवेकर, किरण पवार, प्रणित मालगुडकर, उपशाखा प्रमुख प्रतिक वाजेकर, कुंभार समाज अध्यक्ष अमित वाजेकर, कुंभार समाज तालुकाध्यक्ष रितेश पनवेलकर, कुंभार समाज पंच कमिटी दत्तात्रेय पनवेलकर यांच्यासह बाळासाहेबांची शिवसेनेचे पदाधिकारी आणि कुंभार समाज बांधव उपस्थित होते.



**पनवेल : माघी गणेशोत्सवानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी नवीन पनवेल, वळवली, पनवेल, मोठा खांदा तसेच शेलघर, उलवे नोड या ठिकाणी जाऊन गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी आयोजकांनी त्यांचे स्वागत केले. सोबत भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, सुनील पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# रायगडात माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा

## कुलाबा किल्ल्यातील गणेश मंदिरात भक्तांची रांग





**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हयात बुधवारी (दि.२५) माघी गणेशोत्सव भक्तीमय वातावरणात साजरा झाला. दर्शनासाठी गणपती मंदिरांमध्ये गणेश भक्तांनी गर्दी केली होती. गावोगावच्या गणपती मंदिरांमध्ये विविध धार्मिक,सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

अलिबागच्या कुलाबा किल्ल्यातील ऐतिहासिक आंग्रे कालीन गणपती मंदिरात माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने भजन, पूजन, जन्मोत्सव , आरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मध्यरात्री काकड आरतीने उत्सवाची सुरूवात झाली. गणेश भक्तांनी पहाटे पासूनच दर्शनासाठी लांबलचक रांगा लावल्या होत्या. मंदिर आणि किल्ल्याच्या परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती . उत्सवा निमित्त रांगोळी प्रदर्शनाचही आयोजन करण्यात आले होते.

यावर्षी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले. लहान मुलांपासून वृद्ध नागरिकांनी पहाटेपासूनच रांगेत उभे राहून दर्शनाचा लाभ घेतला. सकाळी १० नंतर समुद्राला भरती असल्याने सकाळच्या सुमारास मंदिरात गर्दी झाली होती. भाविकांनी भरती येण्यापूर्वीच सकाळी लवकर दर्शन घेणे पसंत केले. संध्याकाळी पुन्हा ओहोटीच्या वेळी मंदिरात गर्दी झाली होती. रात्री उशिरापर्यंत दर्शन सोहळा सुरू होता.

दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास गणेश जन्माचा सोहळा पार पडला. या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दर्शनाला येणाऱ्या भाविकांकडून कुठलेही प्रवेश शुल्क न आकारण्याचा निर्णय पुरातत्व विभागाने घेतल्याने गणेशभक्तांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

### रायगडातील मंदिरे भाविकांनी फुलली

*अष्टविनायकांपैकी पालीचा बल्लाळेश्वर व महडचा सिद्धीविनायक ही दोन स्थळे रायगड जिल्ह्यात आहेत. येथील गणेश मंदिरे भाविकांनी अक्षरशः फुलून गेली होती. मुरूड तालुक्यातील नांदगाव येथील सिद्धीविनायक, चिरनेरचा महागणपती, अलिबाग तालुक्यातील नंदूरबाळ, कडावचा बालदिगंबर, जांभुळपाडा येथील सिद्धीगणेश, मुगवलीचा स्वयंभू गणेश अशा प्रमुख मंदिरांमध्येही भविकांची दर्शनासाठी गर्दी झाली होती.*

# माणगावात परीक्षा पे चर्चा चित्रकला स्पर्धेला प्रतिसाद

**माणगव : प्रतिनिधी**

परीक्षा पे चर्चा चित्रकला स्पर्धा बुधवार तारीख २५ जानेवारी रोजी वनवासी कल्याण आश्रम शाळा माणगाव येथे उत्साहात पार पडली.स्पर्धेत तालुक्यातील ३२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

२७ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी शालेय विद्यार्थी, शिक्षक यांच्या समवेत दूरदर्शनच्या माध्यमातून संवाद साधणार आहेत. या अंतर्गत पंचायत समिती माणगावच्या वतीने चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील माध्यमिक शाळांतील प्रत्येकी दहा विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. आजादी का अमृत महोत्सव ,सर्जिकल स्ट्राइक, कोरोना लसीकरणांमध्ये भारत नंबर एक इत्यादी १० विषयांवर विद्यार्थ्यांनी आकर्षक चित्रे काढली. पंचायत समिती माणगावच्यावतीने नेटके आयोजन करण्यात आले होते.


## जाहिरात

**सदर जाहिरातीमधून सर्वांना कळविण्यात येत आहे की, आमच्या हॉस्पिटलमधील जुने सर्व रेकॉर्ड (अॅडमिशन पेपर) साल २००० ते २०१५ पर्यंत काढून टाकण्यात येणार आहेत. तरी जर कोणाला काही माहिती हवी असल्यास जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून हॉस्पिटलमध्ये भेटावे.**

**अमेय क्लिनिक**
प्लॉट नं. ११५, मिडल क्लास हौ.सो., टेलिफोन ऑफिसजवळ, पनवेल, जि. रायगड ४१०२०६.
टेलिफोन नं. २७४८११६६.


# चेंढरे ग्रामपंचायतीची डिजीटल करवसुली

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील चेंढरे ग्रामपंचायतीने अमृतग्राम डिलीटल करप्रणालीद्वारे घरपट्टी व पाणीपट्टी प्रत्येक घराला दिलेल्या क्यूआर कोडने मोबाईल अँड्राईड अॅपद्वारे वसुली करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. ही अमृतग्राम डिजीटल करप्रणाली चेंढरे ग्रामपंचायत व रायगड जिल्हा परिषद यांनी विकसीत केली असून ती अत्यंत उपयुक्त आहे. महाराष्ट्रामध्ये प्रथमच असा उपक्रम राबवला जात असून यामुळे पारंपारीक घरक्रमांक इतिहास जमा होणार आहे.

ग्रामपंचायत आर्थिक दृष्टया सक्षम करण्याचा मुलभूत पाया म्हणजे करवसुली आहे. घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीची पारंपारीक पध्दत तितकीशी प्रभावीपणे राबविता येत नाही.

तसेच आजचे डिजीटल युग अँड्राईडचा वापर सर्रास करीत आहेत. त्याचप्रमाणे कोविड–१९ च्या वेळेस नागरीकांना बऱ्याचशा गोष्टी घरबसल्या मिळाव्यात, अशा अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. त्या अनुषंगाने ही करप्रणाली विकसीत करण्यात आली आहे.

ही करप्रणाली सर्वंकष उपयुक्त होण्याच्यादृष्टीने रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्वत: संगणकीय प्रणालीचे सुक्ष्म निरीक्षण केले. त्यामध्ये अतिरीक्त सुधारणा सुचवून त्याचे निरीक्षण करणे सहज शक्य होईल अशा प्रकारे विकसित करुन घेतली आहे. जेणे करुन पाणीपट्टी आणि घरपट्टी वसुली जास्तीत जास्त करण्यासाठी नियोजन आणि पाठपुरावा करणे सुलभ झाले आहे.

प्रणालीमुळे ग्रामपंचायतीकडून दिले जाणारे जुने पारंपारीक घरक्रमांक इतिहास जमा होणार आहेत. आता क्यूआर कोड हीच घराची ओळख असणार आहे. त्यामध्ये खातेधारकाची माहिती संकलीत केली आहे आणि त्याद्वारे खातेधारकाची घरपटटी व पाणीपटटी वसुली ही मोबाईल अॅपद्वारे युपीआय, रोख, धनादेश, क्रेडिट कार्ड, डेबीटकार्ड तसेच नेट बँकींगद्वारे केली जाते व त्याची पावती संबंधित खातेधारकास मोबाईलवर पीडीएफ स्वरुपात प्राप्त होते.

प्रणालीचा वापर करुन अँड्राईड मोबाईल आणि डेस्कटॉप कॉम्प्युटरच्या माध्यमातून अधिकृत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वसुली करणे सोपे झाले आहे.

अशी ही अमृतग्राम डिजीटल करप्रणाली ग्रामपंचायतीच्या उत्पन्न वाढीस निश्चीतच आधारभूत झाली आहे. चेंढरे ग्रामपंचायतमधील सर्व खातेदारांचा डेटा अचुकपणे अपडेट करुन ही अमृतग्राम डिजीटल करप्रणाली यंत्रणा यशस्वीपणे राबविणारी चेंढरे ग्रामपंचायत पहिली ग्रामपंचायत आहे.




**घरबसल्या भरता येणार**

घरपट्टी व पाणीपट्टीची मागणी व सवलतीचा संदेश संगणकीय प्रणालीद्वारे खातेधारकास प्राप्त होईल. घरपट्टी व पाणीपट्टी वसुली बाबतचे अहवाल पाहता येतात. खातेधारकास आपली घरपट्टी व पाणीपट्टी घरबसल्या लिंकद्वारे सुध्दा भरता येणे शक्य झाले आहे.

# वडखळजवळ अपघात: एक जखमी

**पेण : प्रतिनिधी**

पेण–अलिबाग रोडवरून जाणाऱ्या मोटारसायकलला अज्ञात वाहनाची धडक लागून या अपघातात दत्ताराम कोळी रा. कोळवे हे जखमी झाले आहे.

फिर्यादी दत्ताराम कोळी रा. कोळवे, वडखळ हे मंगळवारी पहाटे आपली मोटार सायकल पेण अलिबाग रोडने रस्त्याच्या डाव्या बाजूने घेऊन जात असताना अलिबाग रोडवर संजीवनी हॉस्पिटलच्या अलिकडे आले असता अलिबाग बाजुकडुन येणाऱ्या डंपरवरील अज्ञात आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील डंपर हायगयीने व बेदरकारपणे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चुकीच्या बाजूने चालवून फिर्यादी यांना ठोकर मारून अपघात केला. अपघातात फिर्यादीला दुखापत झाली असून यावेळी डंपरचालक अपघात ठिकाणी न थांबता वडखळ बाजुकडे पळून गेला. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following tender specification.

| RFx No. | Description | Estimated Cost |
|---|---|---|
| Tend-56/22-23 **RFx No. 7000025707** | Supply & Installation of WTI and OTI of ICT and EHV Transformers at various substations under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 28.88 Lakh |
| Tend-57/22-23 **RFx No. 7000025908** | Work of renovation of earthmat for 220kV Yard and equipment earthing at 220kV Apta substation and 220kV Bombay dyeing substation under EHV (O&M) Division, Panvel. | Rs. 39.11 Lakh |
| Tend-58/22-23 **RFx No. 7000025909** | Work of shifting of control & relay panels at 100kV Taloja and 220kV ONGC substations under EHV (O&M) Division, Panvel. | Rs. 36.47 Lakh |

**EMD**: 1% of Estimated Cost **Tender Fee:** Rs. 500/- + GST **Submission of Bids**: From 25.01.2023 to 01.02.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 02.02.2023 @ 11:00 Hrs.

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm), Tel. No. 022-27459624, Mob. No. 9769006220. e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**


# पोलादपूर चिरेखिंड येथे तांब्याची कॉईल चोरीस



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पितळवाडी महापारेषण महावितरण विभागाचे विद्युत कर्मचाऱ्याने पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये चिरेखिंड येथील ट्रान्सफॉर्मर फोडून त्यामधील कॉईल चोरीला गेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यातील पितळवाडी विभागातील विद्युतसेवक संदीप कृष्णा जाधव यांना चिरेखिंड येथील सचिन ढवळे यांनी २२ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ८ वाजता मोबाईलद्वारे संपर्क करून रात्री १२ वाजल्यापासून विद्युतपुरवठा बंद असल्याचे कळविले होते. सकाळी चिरेखिंड बसस्टॉपकडे गेले असता सचिन ढवळे यांना तिथे असलेल्या ट्रान्सफॉर्मर उघडलेल्या अवस्थेत असल्याचे तसेच आतील तांब्याची कॉईल तुटून खाली पडल्याचे दिसून आले. यानंतर विद्युतकर्मचारी जाधव याने सहायक अभियंता जितेंद्र हसूराम पाटील यांना सदरची वस्तुस्थिती कळवल्यानंतर पोलादपूर पोलीस ठाण्यात ही तक्रार दाखल करण्यात आली. यावेळी सुमारे ७५ किलो वजनाची १५ हजार रूपये किंमतीची तांबे धातूची कॉईल चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येऊन सहायक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक वसंत जाधव अधिक तपास करीत आहेत.

पोलादपूर तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामपंचायती, नळपाणीपुरवठा योजना, नगरपंचायत पोलादपूर, महावितरण आदींच्या सार्वजनिक मालमत्तेची चोरी करण्याच्या उद्देश्याने मोडतोड करून भंगारात विक्री करण्याचे प्रकार वाढीस लागले असल्याने याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी सर्वत्र होत आहे.

# मुरुडच्या महाविद्यालयात पथनाट्याला प्रतिसाद

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड –जंजिरा महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती विषयावर पथनाट्य सादर केले.

स्वयंसेवकांनी पथनाटच मुरुड बाजारपेठेत तहसिलदार रोहन शिंदे, नायब तहसीलदार अमित पुरी, मंडळअधिकारी खुशाल राठोड यांच्या उपस्थित सादर केले. महाविद्यालयामध्ये मतदारांसाठी शपथ ग्रहण कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नितीन पवार व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक माळी रुतिका, सोंडे अय्यान, खामकर भक्ती, भगत रिद्धी, कलबसकर अरफा, लसने अरफात, नखतारे उसामा, मोरे आदिती, आगरकर वेदिका यांनी विशेष मेहनत घेतली.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, आमचे अशिल हे सिडको लि. यांच्याकडून १२.५ टक्के योजनेप्रमाणे लिजधारक **मानवसेवा डेव्हलपर्स ग्रुप तर्फे भागीदार १) श्री. सुनिल धोंडू आलिमकर, २) श्री. सत्यवान धर्मा आलिमकर, ३) श्री. बाबुराव आलो मुंढे, ४) श्री. अजय नारायण पानखडे, ५) श्री. अशोक कान्हा भोईर, ६) श्री. योगेश बाबुराव म्हात्रे, ७) श्री. गणेश आलो मुंढे,** पत्ता: शॉप नं. ए–३, गाभारा बिल्डींग, शिळ–दिवा रोड, शिळगाव, पो. पडाले, ता. व जि. ठाणे ४२१ २०४ यांच्या नावे असलेला खालील वर्णनाचा भूखंड विकसनाकरीता त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इराद्यात आहेत. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :–.

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड**

| भूखंड नं. | सेक्टर नं. | क्षेत्र चौ. मी. |
|---|---|---|
| १३ | १२ | ७९९.७६ चौ.मी. |

तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक : २५/०१/२०२३.

**सही/–**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. मोबाईल क्र. : ९९३०३६९८६१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांचे मालकीची खालील जमिन मिळकत होती व आहे. सदर जमिन मिळकत ही त्यांनी कायदेशिर रित्या स्वत: खरेदी केलेली आहे. सदरची मिळकत ही स्वकष्टार्जीत आहे. सदरची सदरहू मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र है.आर.पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १५२ | ० | ०.३१.५ पो.ख. ०.०.९ | १.४८ |
| १५८ | १/ब | ०.१५.० | ३.१६ |

सदर वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा कायदेशीर हिस्सा व अधिकार आहे. सदरहू जमिन मिळकत आजही आमचे अशिल श्री. विनायक आत्माराम नाझरे, रा. पनवेल यांचे ताबेकब्जा व वहीवाटीत आहे. सदर मिळकती ही आमचे अशिलांना विक्री करण्याचे नाही. परंतु काही एजंट, तोतया इसमांना घेवून, आमचे अशिल असल्याचे भासवून, तोतया इसमांना मुळ जमीन मालक असल्याचे दाखवून या मिळकती बाबत खोटा विक्रीचा व्यवहार करण्याचे विचारात असून बनावट दस्तही बनविण्यात आलेले असल्याचे आमचे अशिलांना समजले आहे.

सबब सदर जमिन मिळकतींच्या संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. सदर मिळकती ह्या केवळ आमचे अशिलाच्या मालकीच्या आहेत. त्याबाबत बनावट एजंट व बनावट / तोतया व्यक्ती व बनावट दस्त बनविणाऱ्या व्यक्तीविरूद्ध आमचे अशिलांनी फौजदारी तक्रार अर्जही दाखल केलेला आहे. सबब सदरबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच आमचे अशिल हे एकमेव मालक असल्याने तोतया व्यक्तीसोबत अथवा कोणत्याही एजंटला आमचे अशिलांनी आपली जमीन विक्री करण्याबाबतचे अधिकार दिलेले नाहीत. सबब सदरील जमीनीबाबत कोणताही विकी व्यवहार करू नये या करिता सदरची नोटीस देत आहे, याची तमाम जनतेने नोद घ्यावी.

पनवेल
तारीख : २३/०१/२०२३

**सही/–**
**अॅड. तृप्ती ग. पाटील**
४, श्रीसमर्थ अपार्टमेंट, शिवाजी रोड, पनवेल
ता. पनवेल, जि.रायगड



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, आमचे अशील सिडको लि. यांच्याकडून खालील वर्णनाची मिळकत ही नवी मुंबई प्रकल्पाकरीता संपादीत करण्यात आलेली आहे. सदर संपादीत मिळकतीपोटी मिळणारा भूखंड मुळ शेतकऱ्यांकडून विकसनाकरीता त्रिपक्षीय करार हस्तांतरीत करुन घेण्याच्या इरादयात आहेत. सदर संपादीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:–

**मौजे – पेंथर, ता. पनवेल, जि. रायगड**

| गाव | यु.केस नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| पेंधर | ४ / ए | ८१ | ० | २–०४–९ | ७.०० |
| | | ८७ | ० | ०–६८–५ | ३.६२ |
| | | ८८ | ० | ०–२०–४ | ०.६९ |
| | | १०२ | ० | ०–८९–० | ७.०६ |
| | | ५७ | ३ | ०–२७–० | १.०६ |
| पेंधर | ४ / ब | ८४ | ० | ०–२७–१ | १.१९ |
| | | ९० | ० | ०–४४–३ | २.०६ |
| | | ७३ | ० | १–११–८ | ७.३७ |
| | | ५४ | १ | ०–१२–० | ०.६९ |
| | | ५५ | ० | ०–१५–४ | २.०६ |
| | | ५६ | ० | ०–१८–५ | २.३१ |
| | | ५७ | १ पै | ०–८०–४ | २.९४ |
| | | ५७ | २ | ०–०२–० | ०.२२ |
| पेंधर | ४ / सी | १०० | ० पार्ट | ०–८६–३ | १०.०६ |
| | | १०४ | ० पार्ट | ०–४०–२ | ४.८७ |
| | | १०५ | ० | ०–५७–३ | ६.४० |
| | | १०८ | ० पी ५ | ०–०९–९ | ०.६४ |
| | | ८९ | ० | ०–५८–० | ३.३७ |
| पेंधर | ४ / डी | ९१ | ० | १–९९–३ | १९.२५ |
| | | ९२ | ० | १–८०–१ | ११.४४ |

वर नमुद संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजने अंतर्गत सिडकोकडून **संचिका नं. ५५८ अंतर्गत मौजे तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड येथे अंदाजे १२५० चौ.मी.** क्षेत्राचा भूखंड वितरीत करण्यात येणार आहे. आमचे अशिल सदर भुखंड **१) श्रीमती साफिया मोहम्मद मोहसिन पटेल, २) श्री. अब्दुल अजीज मोहम्मद मोहसिन पटेल, ३) श्री. अब्दुल लतीफ मोहम्मद मोहसिन पटेल ८) श्रीमती साजिदा दस्तगीर पटेल, ५) श्रीमती नाहीदा इम्रान पटेल, ६) श्रीमती मजिदा रफिउद्दीन पटेल, ७) श्रीमती सौउदा वलीउल्लाह पटेल, ८) श्रीमती शबाना मोहम्मद जाहीद पटेल, ९) कु. यासिरा मो. जाहीद पटेल, १०) कु. बरीराह मो. जाहीद पटेल ११) कु. नामीरा मो. जाहीद पटेल, १२) कु. मशीरा मो. जाहीद पटेल, १३) कु. हुमेरा मो. जाहीद पटेल, १४) कु. उस्मान मो. जाहीद पटेल** या लिज हक्कदारांकडून विकसनाकरीता त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इरादयात आहेत. तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक : २५/०१/२०२३

**सही/–**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**


कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. मोबाईल क्र. : ९९३०३६९८६१


# पंतप्रधान उद्या विद्यार्थ्यांशी साधणार संवाद

## ■ रायगडच्या विद्यार्थ्यांना लाईव्ह कार्यक्रम दाखविण्याचे नियोजन सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे परीक्षा पे चर्चा कार्यक्रमांतर्गत इयत्ता ९ वी ते १२वी दरम्यानच्या विद्यार्थ्यांसह पालक व शिक्षकांशी शुक्रवारी (दि. २७) संवाद साधणार आहेत. हा कार्यक्रम नवी दिल्ली येथील तालकटोरा स्टेडियममध्ये आयोजित केला जाणार असून या कार्यक्रमाचे थेट ऑनलाईन प्रक्षेपण देशातील प्रत्येक शाळेत केले जाणार आहे.



हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना लाईव्ह पाहता यावा, रायगड जिल्ह्यातील शाळांना व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून संवाद कार्यक्रमा वेळी शिक्षण विभागातील प्रतिनिधी शाळांमध्ये उपस्थित राहणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व माध्यमिक विभाग शिक्षण अधिकारी ज्योत्स्ना शिंदे पवार यांनी दिली.

विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या काळात तणावमुक्त राहावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी 'परीक्षा पे चर्चा' याविषयावर थेट संवाद साधणार आहेत. या संवाद कार्यक्रम ९वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना पाहता यावा यासाठी जिल्हा परिषद प्रशासन व शिक्षण विभागाकडून योग्य नियोजन करण्यात येत आहे. जिल्ह्यातील सुमारे १ लाख ४० हजार विद्यार्थ्यांसह शिक्षक व पालक हा कार्यक्रम लाईव्ह पाहणार आहेत.

तालुका स्तरावरील गट विकास अधिकारी या आ शाळांसोबत संपर्क साधून नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच संवाद कार्यक्रम वेळी शिक्षण विभागातील एक प्रतिनिधी शाळेत उपस्थित राहणार आहे.

लोकप्रतिनिधी यांना संवाद कार्यक्रमास आमंत्रित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व माध्यमिक विभाग शिक्षण अधिकारी ज्योत्स्ना शिंदे पवार याबाबत आढावा घेत आहेत.

## निवडक

### रेल्वेस्थानकात आढळला महिलेचा मृतदेह

**पनवेल :** रेल्वे स्टेशन फलाट क्रमांक ०१/०२ येथे एका ट्रेनच्या दरवाजामध्ये मयत महिला आढळून आली आहे. या महिलेच्या नातेवाईकांचा शोध रेल्वे पोलीस घेत आहेत. मयत महिला ही हिंदू असून तिचे वय अंदाजे ५५ वर्षे, उंची चार फूट पाच इंच, अंगाने सडपातळ, रंग गहुवर्ण, केस काळे वाढलेले, नाक सरळ आहे. तसेच तिच्या डाव्या हातावर अस्पष्ट अशी अक्षरे गोंदलेली आहेत. उजव्या हाताच्या पोटरीवर दोन चिन्ह गोंदलेले आहे. तिने अंगात पोपटी शर्ट त्यावर निळ्या, पांढऱ्या रंगाची आडवी व उभी पट्टी आहे.

### विसरलेल्या बॅगा सुपूर्द

**पनवेल :** रेल्वे भरतीसाठी आलेल्या दोन तरुणांच्या विसरलेल्या बॅगा पनवेल रेल्वे पोलिसांनी परत मिळवून




दिल्याने त्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आहे. रेल्वे भरतीसाठी जालनावरून आलेल्या अजय काळे या तरूणाची बॅग पनवेल रेल्वे स्थानकात विसरली होती. तर तुर्भे येथे राहणारा निनाद चौरसिया याची बॅग खांदेश्वर रेल्वे स्थानकात विसरली होती. या दोन्ही बॅगांचा शोध पनवेल रेल्वे स्थानक पोलिसांनी घेऊन त्या त्यांना परत दिल्याने त्यांनी आनंद व्यक्त करून पनवेल रेल्वे पोलिसांचे आभार मानले आहेत.

### सापडलेला मोबाईल पोलिसांना दिला

**पनवेल :** डोंबिवली येथे राहणाऱ्या एका तरुणाला सॅमसंग कंपनीचा मोबाईल सापडला होता. त्यातरुणाने हा मोबाईल पोलिसांकडे सुपूर्द करत प्रामाणिकपणाचे दर्शन घडवले. राहुल हृदयनाथ कांबळे असे या तरुणाचे नाव असून त्याला एक सॅमसंग कंपनीचा – २३ मॉडेलचा आणि ३०,००० रुपये किमतीचा मोबाईल सापडला होता. त्याने तो मोबाईल पोलीस ठाण्यात हजर केला. त्यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक तारळे व पथकाने मोबाईल मालकाचा शोध घेऊन मोबाईलचे मालक संतोष रविकांत परब यांना पोलीस ठाण्यात बोलावून घेऊन मोबाईलची ओळख पटवून मानपाडा पोलीस स्टेशन येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांच्या हस्ते त्यांना परत दिला.

### कलावती देवी पुण्यस्मरण उत्सव

**उरण :** बेळगाव निवासी परमपुज्य आई श्री कलावतीदेवी



यांचा पुण्यस्मरण उत्सव १६ ते २२ जानेवारीदरम्यान श्री संगमेश्वर देवस्थान, देऊळवाडी (उरण शहर) येथे उत्साहात झाला. प्रांतस्मरण व वाचन, सायंस्मरण व वाचन, गुरुपौर्णिमा वाचन, भजन असे विविध धार्मिक कार्यक्रम झाले. या वेळी सिध्दकला भजन मंडळ उरणचे सर्व सदस्य, भाविक भक्त उपस्थित होते.

# पनवेल, उरण, नवी मुंबईत माघी गणेशोत्सव उत्साहात

## चिरनेरच्या महागणपतीला भाविकांची मांदियाळी

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या चिरनेर गावातील श्री महागणपती चरणी नतमस्तक होण्याचा योग भाविकांसाठी गणेश जयंती निमित्ताने काल बुधवारी (दि.२५) जुळून आला. त्यामुळे श्री महागणपती चरणी नतमस्तक होण्यासाठी नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल, पेण व उरण येथील अनेक भक्तांनी आप आपल्या कुटुंबासह श्रीच्या दर्शनासाठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळत होते.



मंदिरात स्थानापन्न असलेली महागणपतीची मूर्ती भव्य, चतुर्भुज, शेंदूर चर्चित असून पद्मासनात बसलेली आहे.मूर्तीच्या हाती खड्ग व पाश आहेत. मूर्ती सुमारे सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद आहे. नवसाला पावणारा गणपती म्हणून चिरनेर गावातील महागणपतीची ख्याती सर्वदूर पसरली आहे. या गणेशाच्या दर्शनाला व हुतात्म्यांच्या बलिदानातून पावन झालेल्या भूमीचे दर्शन घेण्यासाठी नेहमीच भाविकांची व पर्यटकांची गर्दी असते.

गणेश जयंती निमित्ताने मंदिरात श्रीचे अभिषेक, सकाळी काकड आरती, भजन, कीर्तन प्रवचन, भाविकांसाठी महाप्रसाद आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भक्तगन भावनिक वातावरणात तलीन झाले होते. येणाऱ्या भाविकाना श्रीचे दर्शन सुलभ घेता यावे यासाठी मंदिर कमिटीचे ट्रस्टी महेंद्र पाटील, मंगेश पाटील, संतोष ठाकूर, सुजित पाटील, पदाधिकारी, ग्रामस्थ हिरीरीने सहभाग घेत होते. त्यामुळे अनेक भाविकांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती.

गणेश जयंती सोहळ्याचे औचित्य साधून अनेक व्यवसायिकांनी आप आपली दुकाने मांडली होती. दुकानातील साहित्य, खाद्य पदार्थ खरेदी करण्यासाठी भाविकांनी गर्दी केल्याने व्यावसायिकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

## नेरूळमध्ये भक्तांची अलोट गर्दी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळमधील शिरवणे येथील पुरातन स्वयंभू श्री गणेश मंदिरांसह विविध धार्मिक स्थळी माघी गणेश जयंतीत दर्शनासाठी अलोट गर्दी होती. या वेळी धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, भजन व महाप्रसादा आयोजित करण्यात आले होते.



प्राचीन काळापासून जागृत देवस्थान असलेल्या शिरवणे गावातील स्वयंभू गणेश मंदिरात माघी गणेशोत्सव भक्तगणांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. माघी गणेश दर्शनासाठी भक्तांनी मोठी गर्दी केली होती. शिरवणेमधील चिंचोली तलावाजवळ असलेल्या पुरातन स्वयंभू गणेश मंदिरात माघी गणेशोत्सवानिमित विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

प्रारंभी, स्वयंभू गणेश मंदिरात पहाटे अभिषेक व महापूजा सकाळी प्रतिक शेळके यांचे स्वर नाद भक्ती संध्या भजन तर दुपारी महाप्रसादाचा हजारो भक्तांनी लाभ घेतला. त्यानंतर गायिका सुप्रिया ठाकुर-घरत, गव्हाण यांचे तर शिरवणे येथील वासुदेव सुतार, नंदकुमार सुतार व देवेंद्र पवार बुवा यांचे सुश्राव्य भजनाचा आनंद भक्तांनी घेतला.

या वेळी भाजपचे नवी मुंबई महामंत्री डॉ. राजेश पाटील, माजी नगरसेविका माधुरी सुतार यासह ठाणे बेलापूरमधील गणेश भक्तांनी जागृत स्वयंभू गणेशाचे सहपरिवार दर्शन घेतले. माघी गणेश जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी गणेश मंदिर चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव भाजप नेते माजी महापौर जयवंत सुतार, अध्यक्ष पंढरीनाथ नाईक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# शिवनगर व मोहोपाड्यात विविध धार्मिक कार्यक्रम

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

मोहोपाड्यातील स्थानिकांचे नवीन वसाहतीचे ठिकाण असलेल्या शिवनगर येथे शिवसागर जनसेवा मित्र मंडळ व ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने पहाटे पाच वाजता काकडा आरती, सकाळी सात वाजता श्री गणेश मुर्ती अभिषेक, दुपारी बारा वाजता श्री गणेश जन्म, सायंकाळी सहा वाजता हरिपाठ, सायंकाळी सात वाजता महाआरती व तिर्थप्रसाद आदी कार्यक्रम झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवनगर ग्रामस्थांनी अथक परिश्रम घेतले.


तर मोहोपाडा येथील श्री गणेश मंदिरात माघी गणपती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम झाले. यात माधुरी ओक पुणे यांचे किर्तन,ज्योती काजरेकर यांचे नर्मदा परिक्रमाचे अनुभव कथन, स्थानिक कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम तर बुधवारी दुपारी गणपती जन्म उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला.

सायंकाळी सहा वाजता सुर नवा ध्यास नवामधील कलाकार रश्मी मोघे व सहकलाकार यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. या वेळी परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.





पनवेल : भाजप चिंध्रण पंचायत समिती सरचिटणीस प्रमोद भगत यांच्या निवासस्थानी माघी गणेशाचे भाजप तालुका खनिजदार शिवाजी दुर्ग, रवींद्र पाटील, दिनेश फडके, पिंटु म्हात्रे आदींनी दर्शन घेतले.



उरण : तालुक्यातील पाले येथील श्री. गणेश मित्र मंडळाच्या माघी गणेश उत्सवाला मच्छिंद्र सुरेश म्हात्रे यांनी भेट देत दर्शन घेतले.

# फुंडे हायस्कूल येथे चित्रकला स्पर्धा

**उरण : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद, शालेय शिक्षण विभाग यांच्या आदेशानुसार पंचायत समिती उरण – शिक्षण विभाग अंतर्गत इयत्ता ९ वी ते १२ वी गटात विद्यार्थ्यांच्या 'परीक्षा पे चर्चा पर्व-६' चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. सदर स्पर्धा उरण पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी प्रियांका म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली फुंडे हायस्कूल येथे बुधवारी (दि. २५) झाल्या.



या स्पर्धेचे आयोजन विद्यालयाच्या प्राचार्या सुनिता वर्तक, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे आणि कला विभाग प्रमुख साधना म्हात्रे यांच्या नियोजनाखाली उत्तमरीत्या करण्यात आले होते. विद्यालयाच्या भव्य प्रांगणात या चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या चित्रकला स्पर्धेत जसखार, चिरनेर, चिर्ले आणि कोप्रोली या चार केंद्रांतर्गत फुंडे हायस्कूल, भेंडखळ, जासई, पिरकोन, दिघोडे, जे.एन.पी.टी., सेंट मेरी, बीसीटी, वेश्वी, आवरे, वशेणी, मोठीजुई, चिरनेर, पाणदिवे या शाळांमधील एकूण ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेदरम्यान जसखार केंद्रप्रमुख टी. जी. म्हात्रे, विषय साधनव्यक्ती गुरुनाथ ठोंबरे, वैशाली गावंड, अनिता काटले, मुकेश महाजन यांनी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले. या वेळी विविध शाखेतून विद्यार्थ्यांसमवेत आलेले मार्गदर्शक शिक्षक व फुंडे हायस्कूलचे सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मोदींच्या नेतृत्वामुळे जगात भारताचा सन्मान वाढला -आमदार गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे संपूर्ण जगात भारताचा सन्मान वाढला असून सामर्थ्यवान पिढी घडत असल्याचे चित्र देशात दिसते आहे, असे प्रतिपादन लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी केले आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या 'परीक्षेपे चर्चा' या उपक्रमांतर्गत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या कार्यक्रमानुसार ऐरोली विधानसभा क्षेत्रामध्ये श्री गणेश नाईक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने एक्झाम वॉरियर्स भव्य चित्रकला स्पर्धा २४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत तब्बल दहा हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कल्पकतेने चित्रे रेखाटली.

वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहामध्ये गुरुवारी (दि. २५) या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ झाला. या वेळी लोकनेते आमदार गणेश नाईक, भाजपचे प्रदेश महामंत्री विक्रांत पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, ऐरोली विधानसभा क्षेत्राचे प्रथम आमदार आणि श्री गणेश नाईक चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, भाजप नवी मुंबई अध्यक्ष रामचंद्र घरत, भाजपाच्या समन्वयक प्राध्यापिका वर्षा भोसले, आंतरराष्ट्रीय खोखोपटू शितल भोर, महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती अनंत सुतार, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेविका माधुरीताई सुतार, माजी स्थायी समितीच्या सभापती नेत्रा शिर्के यांच्यासह मान्यवर लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, खेळ, कला, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार नाईक यांनी पंतप्रधानांच्या प्राधान्यक्रमामध्ये विद्यार्थी वर्ग हा अग्रस्थानी असून एक सामर्थ्यवान पिढी घडवण्याचे काम देशांमध्ये सुरू असल्याचे मत मांडले. पंतप्रधानांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे आवाहन त्यांनी या वेळी केले.

स्पर्धेमधील विजेता विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र आणि आकर्षक पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला.



# भाजपचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रेंच्या प्रचारार्थ आमदार मंदा म्हात्रेंच्या शिक्षकांसोबत बैठका



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

कोकण शिक्षक मतदारसंघाचे भाजप-बाळासाहेबांची शिवसेना-आरपीआय महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रचारार्थ बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी बेलापूर मतदारसंघातील शाळांच्या शिक्षकांसह बैठक सत्र सुरू केले आहे. त्या पार्श्वभूमीवर नेरूळ येथील एसव्ही हायस्कुल व ज्युनियर कॉलेजमध्ये विविध शाळांच्या शिक्षकासमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी भाजपचे उमेदवार मोठ्या मतांच्या फरकाने निवडून येईल, असा विश्वास आमदार म्हात्रे यांनी बोलताना केला.

या वेळी भाजपा महामंत्री डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, माजी नगरसेवक सुनिल पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे, पांडुरंग आमले, सुहासिनी नायडू, कुणाल महाडिक व मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते. त्यानंतर बेलापूर गाव येथील विद्याप्रसारक हायस्कुल शाळेतील शिक्षकांसह बैठक झाली. या वेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष पंढरीनाथ दादा पाटील, सचिव संदेश पाटील, मुख्याध्यापक दीपक दिवेकर, शिक्षक उपस्थित होते. युतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना मतदान करण्याचे तसेच मतदान करताना कशा पद्धतीने करावे या संदर्भात सर्व शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, शिक्षकांच्या व्यथा, मागण्या व समस्या जाणून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने काम करणारे कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रचारार्थ सर्व शाळांमध्ये शिक्षकांच्या बैठकी घेत आहोत. भाजपा सरकार शिक्षक व संबंधित घटकांचे प्रश्न कायम सोडवीत आले आहेत. ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या रूपाने एक अभ्यासू व शिक्षकांसहित नागरिकांसाठीही अविरत कार्यरत असणारा उमेदवार विधान परिषदेवर प्रचंड मताधिक्याने निवडून जाणार असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. सर्व शाळांमध्ये बैठकीचे सत्र सुरू असून शिक्षकही सदरबाबत सकारात्मक आहे असे सांगितले.

बेलापूर मतदारसंघातून जास्तीत जास्त आघाडी देण्याचा आमचा मानस असून भाजपा-बाळासाहेबांची शिवसेना युतीचा उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचा विजय निश्चित असून विजयाची केवळ औपचारिकता बाकी असल्याचे आमदार म्हात्रे यांनी सांगितले.

# माघ मासोत्सवात उसळली गर्दी

## पालीमध्ये जत्रा भरली : ३०० दुकाने थाटली; करोडोंची उलाढाल

**पाली : प्रतिनिधी**

आयएसओ मानांकन प्राप्त व महाराष्ट्रातील प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या पालीतील श्री बल्लाळ विनायकाचा माघ मासोत्सव (दि.२२) ते (दि.२६) पर्यंत साजरा होत आहे. मासोत्सवासाठी पाली नगरी सजली असून सर्वत्र भक्तिमय वातावरण पहायला मिळत आहे. यानिमित्त पालीत मोठी जत्रा सुद्धा भरली आहे. विविध राजकीय पक्षाचे पुढारी व नेतेगण यांचे माघी उत्सवाच्या शुभेच्छा बॅनर थाटले आहेत.



भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टने उपाययोजना केल्या आहेत. याबाबत नियोजन बैठक पाली तहसील कार्यालयात तहसीलदार उत्तम कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तहसीलदार यांनी सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून तसेच बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट यांच्याकडून नियोजनाची माहिती घेवून मार्गदर्शक सूचना केल्या.

यावेळी पोलीस प्रशासन चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी दिली. राज्य परिवहन मंडळाकडून अतिरिक्त गाड्यांची सोय करण्यात आली असून त्याचे आरक्षण करण्यासाठी पाली बसस्थानक तसेच मंदिर परिसरात देखील एक विशेष सोय केली आहे.

मंदिर प्रशासन तसेच पाली नगरपंचायतकडून यात्रेकरूंच्या सोयीसाठी तसेच याकालावधीत स्वच्छता राहावी म्हणून नगरपंचायतीकडून पाणी आणि स्वच्छता, जागोजागी कचराकुंड्या याची व्यवस्था करण्यात आली आहे.

दर्शन मंडप, नवीन शौचालये देखील बांधण्यात आली आहेत. त्याचबरोबर रुग्णवाहिका, डॉक्टर, अग्निशमन वाहन, पाण्याचे टँकर, लाईट जनरेटर याची देखील सोय नियोजन बद्ध करण्यात आली असल्याचे देवस्थान चे अध्यक्ष जितेंद्र गद्रे यांनी सांगितले. वाहतूक कोंडी रोखाण्यासाठी उपयोजना करण्यात आली आहे. मोठ्या वाहनांची वाहतूक गावाबाहेर थांबविण्यात आली आहे. त्याबरोबर उंबरवाडी येथे तसेच वाकणच्या दिशेने धारिया यांच्या जागेत आणि झाप गावाकडे वाहनतळाची व्यवस्था असून तेथून भाविकांना आणण्यासाठी रिक्षांची मोफत सोय आहे. उत्सवात विविध प्रकारची ३०० दुकाने थाटली आहेत.

**मंदिरला विद्युत रोषणाई व सजावट**

उत्सवानिमित्त मंदिर व मंदिर परिसराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिर तलावा भोवती संतांच्या व इतर मुर्त्या व देखावे लावले आहेत. तिथेही अभिरंगी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. कारंजे देखील आहेत. रोंगोळी काढण्यात आली आहे. फुलांच्या हारांनी सजावट केली आहे. तसेच मंदिराच्या प्रवेशद्वारावर आकर्षक मोठी कमान बसवण्यात आली आहे.

**मंदिर प्रशासनाने भाविकांच्या सोयीसाठी मोफत नाश्ता तसेच प्रसादाची सोय करण्यात आली असून त्याचा भाविकांनी लाभ घ्यावा. भाविकांना राहण्यासाठी दोन सुसज्ञ भक्त निवास आहेत. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य पार्किंग देखील आहे. तेथे मोफत पार्किंगची व्यवस्था आहे. तसेच सुसज्ञ स्वच्छता गृह देखिल आहे. त्यामुळे दर्शनासाठी येणार्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही. पालखी मार्गाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध केला आहे.**
**–जितेंद्र गद्रे, अध्यक्ष,**
**बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट**

# रोह्यातील पुरातन मंदिरात माघी गणेश जयंती उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नामदेव शिंपी समाजाच्या १२८ वर्षांच्या पुरातन आणि जागृत श्री गणपती मंदिरात माघी गणेश जयंती उत्सव मोठ्या भक्ती भावाने उत्साहात साजरा करण्यात आला.

समाजाचे अध्यक्ष मकरंद प्रभाकर बारटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली श्रींच्या मूर्तीवर अभिषेक, पूजा, आरती किरण बारटक्के व रेवती बारटक्के या दाम्पत्याच्या शुभहस्ते विधिवत करण्यात आले. रवी पतंगे यांनी उत्कृष्ट पौरोहित्य केले. या मंगलदिनी सकाळी श्री गणेशाची सुमधुर भक्ती गीते, रंगीबेरंगी फुलांच्या माळा, सुबक रांगोळी, विद्युत रोषणाई करून मंदिर सुशोभित करण्यात आले होते. असंख्य भाविकांनी रांगेत उभे राहून श्रींचे दर्शन घेतले आणि मनोभावे प्रार्थना केली.

शेकडो भक्तगणांनी महाप्रसाद घेतला समाजाचे अध्यक्ष मकरंद बारटक्के व त्यांचे पदाधिकारी सदस्य, महिला अध्यक्षा पूनम प्रमोद पाटुकले त्यांच्या पदाधिकारी व सदस्य, समाज बांधव आणि भगिनी यांनी उत्सव विषयी करण्यासाठी परिश्रम घेतले.

दुपारी जय भवानी भजनी मंडळ वरवडे पाले यांचे सुश्राव्य कीर्तन झाले तर समाजाच्या बंधू भगिनी आणि मुलांनी सामुदायिक अथर्वशीर्ष केले दिवसभर श्रींच्या दर्शनासाठी भक्तगण येत होते.

यावेळी तहसीलदार कविता जाधव, पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर, नायब तहसीलदार राजेश थोरे, विविध क्षेत्रातील मान्यवर श्री भक्तगणांनी मंदिरात येऊन मनोभावे दर्शन घेतले.




# महड वरदविनायक जन्मोत्सवाला भाविकांची उसळली अलोट गर्दी

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील अष्टविनायकापैकी एक असलेल्या महड मंदिरात गणेश जन्मोत्सव सोहळा भाविकांच्या अफाट गर्दीत उत्साहात साजरा करण्यात आला. नवसाला पावणारा अशी ख्याती असलेला महड येथील वरदविनायक गणपती मंदिरात माघी गणेशोत्सव विविध धार्मिक ,सांस्कृतिक कार्यक्रमाने दरवर्षी साजरा केला जातो.



जन्मोत्सव निमित्ताने कीर्तनाचे आयोजन मंदिरात केले होते. यावेळी मंदिरातील सभा मंडप भाविकांनी तुडुंब भरला होता. मंदिरा बाहेर देखील भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. कडधान्याच्या सहाय्याने जवळपास तीस फूट लांब आणि दहा फूट रुंदीची अतिशय सुंदर रांगोळी काढण्यात आली होती. याशिवाय मंदिराचा गाभारा आतून बाहेरून झेंडूच्या फुलाने सजवण्यात आला होता. झेंडूच्या फुलांमध्ये भारताचा नकाशा, भारत माता ,आणि गणपतीची प्रतिकृती आपटी खालापूर येथील दीपक नाना पाटील यांनी सुंदर साकारली होती.

**भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी देवस्थान संस्थानकडून विशेष काळजी घेण्यात आली आहे. भाविकांना निर्विघ्नपणे दर्शन घेता यावे यासाठी चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे.**
**: ॲड. मोहिनी वैद्य–**
**कार्याध्यक्ष देवस्थान संस्था महड**

# नाभिक समाज जिल्हाध्यक्षपदी प्रणाली पवार, रेश्मा जाधव, दिपाली शिंदे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नाभिक समाज तरूण संघ महिला रायगड जिल्हा अध्यक्षपदी प्रणाली प्रंभजल पवार, रेश्मा जाधव व दिपाली शिंदे यांना नियुक्ती देण्यात आली आहे.

जिल्हा नाभिक तरूण संघाचे जिल्हा अध्यक्ष सुदाम शिंदे, रायगड जिल्हा विश्वस्त यशवंत खराडे, व जिल्हा सदस्य मंगेश रावकर यांच्या संकल्पनेतून रोहा तालुक्यात कोलाड येथे नाभिक समाज तरूण संघाचेवतीने जिल्हातील महिलासाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्या अर्पणाताई घोसाळकर, शिवसेना महिला जिल्हा प्रमुख निलिमाताई घोसाळकर, उदयोजिका निलमताई कदम यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे निमित्ताने महिला जिल्हा पदाधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या, यामध्ये नाभिक समाज तरूण संघ महिला जिल्हा अध्यक्षपदी प्रणाली प्रभंजल पवार, रेश्मा जाधव व दिपाली शिंदे यांचे एक मताने निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी रश्मी राकेश मोरे, स्नेहल स. मोरे, विशाखा वि. यादव, रजनी र. विभार यांची निवड करण्यात आली. तर सचिव पदी नम्रता नितिन बडे व पुनम चव्हाण यांना पदभार सोपविण्यात आला. तर खनिजदारपदी लिना अनिल खराडे यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.

यावेळी उर्मिला देवकर, स्मिता गायकवाड, संगिता शिंदे, प्रतिक्षा भोसले, वैशाली शिंदे, अश्विनी कडू, गौरी रावकर, साक्षा सकपाल, सुषमा माने, मोहिते, शिंदे, कदम, जाधव, रावकर, शिर्के, सांळुखे, दिवेकर, भोसले, पवार, मुकादम, काशिद, पवार आदी महिलांची प्रमुख उपस्थिती होती तर शिर्के गुरूजी, देवलर, संतोष गायकवाड, अनंत खराडे, सुरेंद्र पांलाडे, ॲड विवेक मोरे, प्रभाकर मोहिते, आंदेश बुरूणकर, नारायण सकपाल, महेश खराडे, संतोष पवार, चंद्रकांत कदत गोविंद जाधव, रघुनाथ विभार, सदानंद सांळुखे, विजय भोसले, मंगेश रावकर, शेखर सकपाल, दिलिप जाधव, प्रदिप शिंदे, महेश कडू, विलास यादव, शिंदे, रावकर, सकपाल, जाधव, खराडे, बडे, सांळुखे, यादव, पवार, कडू, मोहिते, टके, माने, मोरे, कोंडे, मुकादम, काशिद तसेच अलिबाग तालुका अध्यक्ष व जिल्हा संघटक विजय ना.भोसले, समीर म. पवार, सचिन द. आम्रे,राकेश द. मोरे, प्रतिक्षा भोसले, पल्लवी प्र. मोरे, श्रुती वि. भोसले व इतर जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, विभागीय पदाधिकारी, सर्व महिलावर्ग, समाज बांधव व भगीनी यांची उपस्थिती प्रामुख्याने होती. मान्यवरांचे हस्ते नवनिर्वाचीत महिला पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# रोहा महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**


रोहे येथील कोकण एज्युकेशन सोसायटीचे डॉ. चिंतामणरावव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय निवडणुक साक्षरता क्लब, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व डी.एल.एल.इ.विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम उत्साहात साजरा झाला.



या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अतुल साळुंके, मार्गदर्शक म्हणुन परिविक्षाधीन तहसीलदार प्रकाश अमोगसिद्ध म्हेत्रे, महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व रायगड जिल्हा समन्वयक प्रा. तुळशिदास मोकल,कार्यक्रम अधिकारी प्रा. सीमा भोसले, प्रा.अनंत थोरात, डी.एल.एल.इ.विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.शत्रुघ्न लोहकरे, डॉ. अनिल शिंदे,प्रा.सुकुमार पाटील,डॉ. कमलाकर कांबळे,डॉ.सम्राट जाधव, प्रा. सीमा भोसले, प्रा.अनंत थोरात, प्रा. शिल्पा खाडे व प्रा.वैशाली कानावडे उपस्थित होते.

प्रा. तुळशिदास मोकल यांनी प्रास्ताविक केले. यावेळी तहसीलदार प्रकाश अमोगसिद्ध म्हेत्रे म्हणाले, नागरिकांना त्यांच्या मतदानाच्या अधिकाराची जाणीव व्हावी तसेच लोकशाहीत मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व काय आहे, ते हक्क बजावल्याने काय परिणाम होऊ शकतो. तसेच मतदारांची भूमिका कशी महत्त्वाची ठरु शकते याबद्दल उपस्थितांना प्रबोधीत केल.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अतुल साळुंके यांनी मतदार दिनाबाबत मार्गदर्शन केले. मतदार दिन कार्यक्रमाचा एक भाग म्हणुन महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत हर्षाली कदमला प्रथम तर राज विजय जाधव याला द्वितीय तर अनिषा शेटेला तृतीय क्रमांक मिळाला. या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. प्रास्तविक प्रा. तुळशिदास मोकल यांनी केले तर आभार प्रा.शत्रुघ्न लोहकरे यांनी मानले.



**प्रतंप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी दिलेल्या आदेशानुसार २५ जानेवारी रोजी परीक्षा पे चर्चा या उपक्रमाअंतर्गत मुरुड तालुक्यातील प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत मोठा सहभाग नोंदवला होता. मुरुड शहरातील सर.एस.ए.हायस्कूल च्या भव्य पटांगणावर हजारो विद्यार्थी विविध विषयावर चित्र काढण्यासाठी जमले होते.**

# मुरुड ग्रंथालयातील रंगली साहित्यिक मैफील

**मुरुड : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मराठी भाषा टिकवण्यासाठी व त्या भाषेचे संवर्धन होण्यासाठी कोणा एका घटकाची जबाबदारी नसून मराठी बोलणाऱ्या सर्वच लोकांची हि सामूहिक जबाबदारी आहे. मराठी भाषा वृद्धीगंत होण्यासाठी विविध लेखकांचे पुस्तक मेळावे,साहित्यकांची व्यख्याने,विविध वर्तमान पत्रांचे वाचन सर्वानीच करणे गरजेचे आहे .भाषेचे जास्तीत जास्त वाचन व सर्वच व्यवहारात वापर केला गेला तरच आपण आपल्या मराठी भाषेचे संवर्धन बरोबरच प्रचार व प्रसार करू शकणार आहोत. यासाठीच मराठी भाषा बोलणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने भाषा संवर्धनाचा विडा उचलून या भाषेची काळजी घेतली तर या भाषेचा प्रसार झाल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन मुरुड तालुक्याचे कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष संजय गुंजाळ यांनी केले आहे.



मुरुड जंजिरा वाचनालय आणि कोकण मराठी साहित्य परिषद, मुरुड जंजिरा शाखा यांच्या संयुक्त विद्यामाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या अंतर्गत मुरुड वाचनालयात जागर माय मराठीचा हा साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या प्रसंगी गुंजाळ आपल्या भाषणात बोलत होते.

कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाली. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष जयवंत अंबाजी, उपाध्यक्षा दीपाली जोशी, ग्रंथपाल उत्कर्षा गुंजाळ, कोमसाप मुरुड शाखा अध्यक्ष संजय गुंजाळ ,मुरुड प्रशासन अधिकारी दीपाली दिवेकर, युवाशक्ती जिल्हा प्रमुख सिद्धेश लखमदे, कार्याध्यक्ष अरुण बागडे, उपाध्यक्षा उषा खोत, सचिव उषा खोत आणि विनय मथुरे, वाचनालयाचे कार्यवाह उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे अध्यक्ष जयवंत अंबाजी यांनी केले. यानंतर रुद्धी भगत, आशिष पाटील,वासंती उमरोटकर, सिद्धेश लखमदे, उषा खोत, नैनिता कर्णिक, गार्गी खोत, दीपाली दिवेकर, वैशाली कासार, ओम जोशी, आशुतोष कर्णिक व वसंतराव नाईक महाविद्यालयातील काही विध्यार्थ्यांनी कविता, कथा, अभिवाचन, गीतगायन करून श्रोत्यांचे मनोरंजन केले. संजय गुंजाळ यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या अंतर्गत कोमसाप मुरुड यांनी आखलेले कार्यक्रम सांगितले.

मराठी भाषेतील गोडवा आपल्या विशेष शैलीत विषद करून नटसम्राट ह्या नाटकातील एका प्रसंगाचे अभिवाचन केले. दीपाली जोशी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अस्मिता पेंडसे यांनी त्यांच्या मधुर वाणीने केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आशिष पाटील व स्वप्नील भायदे यांनी खूप मेहनत घेतली.

## आनंदीबाई प्रधान महाविद्यालयात मतदार दिनानिमित्त भित्तीपत्रक स्पर्धा



**नागोठणे : प्रतिनिधी**

येथिल कोकण एज्यूकेशन सोसायटीच्या आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मतदार दिनानिमित्त भित्तीपत्रक स्पर्धा व त्याच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रदर्शनाचे उद्घाटन रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. दिनेश भगत यांच्या हस्ते पार पडले. या प्रदर्शनात २७ भित्तीपत्रकासह ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. रा से यो कार्यक्रम अधिकारी डॉ. विकास शिंदे यांनी आयोजन व सुत्रसंचालन केले. आभार प्रदर्शनपुनम जोशी यांनी मानले. भित्तीपत्रकांचे परीक्षण डॉ. स्मिता चौधरी, डॉ. मनोहर शिरसाठ व निवेदिका म्हात्रे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रो. डॉ. श्रीकृष्ण तुपारे सह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रा से यो स्वंयसेवकांनी मेहनत घेतली.




# न्यूझीलंडविरुद्धची मालिका भारताच्या खिशात

## रोहित-शुबमनची कमाल, शार्दूलची धमाल

**इंदोर : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील तिसरा सामना इंदोरच्या अहिल्यादेवी होळकर क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. भारताने ९० धावांनी तिसरा सामना जिंकत मालिका ३-०ने खिशात घातली.

रोहित शर्मा आणि शुबमन गिल या सलामीवीरांनी झळकावलेल्या वेगवान शतकांच्या जोरावर भारताने ५० षटकांत नऊ बाद ३८५ धावा केल्या. तीन गडी बाद करीत ब्रेक थ्रू मिळवून देणार्‍या शार्दूल ठाकूरला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला, तर या मालिकेत सर्वाधिक धावा करणार्‍या शुबमनला मालिकावीराचा किताब देण्यात आला.

टीम इंडियाने ठेवलेल्या डोंगराएवढ्या ३८६ धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. शून्य धावांवर असताना हार्दिक पांड्याने फिन अ‍ॅलनला बाद केले, मात्र त्याचा साथीदार डेव्हॉन कॉनवेने भारतीय गोलंदाजांना चौकार-षटकार ठोकले, मात्र न्यूझीलंडचा डाव २९५ धावांवर आटोपला.

भारताने प्रथम फलंदाजी करताना रोहित आणि शुबमनमध्ये २१२ धावांची सलामी भागीदारी झाली. रोहित शर्माने ८३ चेंडूत शतक साजरे केले. त्याच्या या शतकी खेळीला नऊ चौकार आणि सहा षटकारांचा साज होता. हे त्याचे दुसर्‍या क्रमांकाचे सर्वांत जलद शतक ठरले असून १९ जानेवारी २०२०नंतर रोहितने शतक झळकावले आहे. तो १०१ धावांवर बाद झाला, तर शुबमन गिलने ७२ चेंडूत शतक साजरे केले. गिलच्या या खेळीत १३ चौकार आणि चार षटकारांचा समावेश आहे. सलग चार डावातील शुबमनचे तिसरे शतक ठरले असून ११२ धावा करून तो बाद झाला.

अखेरच्या काही षटकांत हार्दिक पांड्या आणि शार्दूल ठाकूर यांनी अर्धशतकी भागीदारी करीत भारताला ३८५ धावसंख्येपर्यंत पोहचवले. हार्दिकने ३८ चेंडूत ५४ धावा केल्या.

## व्यावसायिक पुरुष राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा थरार

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रभादेवीतील ओम् ज्ञानदीप क्रीडा मंडळाच्या विद्यमाने आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने २८ ते ३१ जानेवारी या कालावधीत व्यावसायिक पुरुष राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

मुंबई-आदर्श नगर येथील वरळी स्पोर्ट्स क्लबच्या क्रीडांगणावर सायंकाळी ५ ते रात्रौ १० या वेळेत हे सामने खेळविण्यात येतील. ही स्पर्धा मॅटवर खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेत मुंबई शहर, रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, पुणे या जिल्ह्यातील व्यावसायिक संघांनी आपले प्रवेश निश्चित केले असून लवकरच या संघाची गट विभागणी करण्यात येईल. अधिक माहितीकरिता स्पर्धा प्रमुख जितेश शिरवाडकर (९७७३२५८३००/८८५०९३४९०६) किंवा सुनील करंबळे (९८९२१४६८२८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पोलादपूर तालुका प्रिमियर लिग कबड्डी स्पर्धा

# आबासाहेब वॉरियर्स विजयी

**पोलादपूर : प्रतिनिधी**



पोलादपूर तालुका प्रिमियर लिग कबड्डी स्पर्धेमध्ये लोहारमाळ येथील आबासाहेब वॉरियर्स संघ अंतिम विजेता ठरला, तर दरेकर लायन्स संघ उपविजेता ठरला.

पोलादपूर तालुका कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने सरकार एबी ग्रुप आयोजित पोलादपूर कबड्डी प्रीमियर लीग (पीकेपीएल) २०२३ ही लीग स्पर्धा उत्साहात झाली. या स्पर्धेमध्ये अनेक नावाजलेले खेळाडू सहभागी झाले. स्पर्धेमध्ये दरेकर लायन्स संघ उपविजेता ठरला, तर देशमुख ७ स्टार आणि संभाजी ब्रिगेड पोलादपूर या संघांना तृतीय आणि चतुर्थ क्रमांक प्राप्त झाला.

बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रतोद आमदार भरत गोगावले, राजिपचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, नगराध्यक्षा सोनल गायकवाड, माजी उपनगराध्यक्ष प्रकाश गायकवाड, मनसेचे चेतन उतेकर, हनुमंत जगताप आदी या वेळी उपस्थित राहिले.

स्पर्धेच्या शुभारंभाच्या वेळी असोसिएशनचे अध्यक्ष संदेश कदम आणि अन्य पदाधिकारी तसेच आयोजक सरकार एसडी ग्रुपचे सदस्य यांच्या उपस्थितीत ५६५ किलो वजन उचलणारी वेटलिफ्टर प्रतिक्षा गायकवाड आणि आद्यपत्रकार स्व. बाळशास्त्री जांभेकर दर्पण पत्रकारिता पुरस्कार विजेते शैलेश पालकर, तसेच सचिन दरेकर, सुरवसे, मोरे आदी शिक्षक, शालेय कबड्डी खेळाडू चैतन्या मांढरे आदींचा सन्मान करण्यात आला. शालेय क्रीडा स्पर्धेत १४,१७,१९ वर्षे या गटात जिल्हास्तरावर पारितोषिक प्राप्त शाळांचा सन्मान करण्यात आला.











पनवेल : कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रचारासाठी विरुपाक्ष मंगल कार्यालयात बुधवारी मुख्याध्यापक व शिक्षकांचा स्नेहमेळावा आयोजित केला होता. सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह इतर मान्यवरांनी मार्गदर्शन करीत ज्ञानेश्वर म्हात्रे यांना विजयी करण्याचे आवाहन केले. या वेळी मोठ्या संख्येने शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com